**विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.** ( Containment Zone मधील नागरीकांचे समुपदेशनासाठी अधिकारी यांची नियुक्ती )

जिल्हाधिकारी कार्यालय.नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-
दि. ०८/०५/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

४) आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांचे पत्र क्र.नांवामनपा/कोरोना-१९/ ४५२/२०२० दि.०२.०५.२०२०, व वेळोवेळी निश्चित केलेले Containment Zone

५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. कोरोना-२०२०/सीआर ५८/आरोग्य -५ सार्वजनिक आरोग्य विभाग दि.०४.०५.२०२०

६) या कार्यालयाचे समक्रमांकित कोविड-१९, उपचार केंद्र अनुषंगीक कामे पार पाडण्यासाठी नियुक्त नोडल अधिकारी यांचे आदेश दि.०७.०५.२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यानुसार उक्त रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मला ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.०४ वरील पत्रान्वये, आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांनी महानगरपालिका हद्दीत कोविड १९ चे रूग्ण आढळून आल्यामुळे अशा क्षेत्रामध्ये संसर्गाचा इतरत्र प्रसार होऊ नये म्हणून सदरचे क्षेत्र हे Containment Zone म्हणून घोषीत केले आहे.

त्याअर्थी, वरीलप्रमाणे घोषीत केलेल्या Containment Zone मध्ये या रोगाचा प्रसार रोखण्यासंबंधाने तपशीलवार धोरण व करावयाचे उपाययोजना वेळोवेळी जाहीर करण्यात आले असून, त्याबाबत आरोग्य विभागाने सुध्दा प्रमाणित कार्यपध्दती (SOP) जाहीर केलेली आहे. त्यानुषंगाने सदर Containment Zone मधील नागरीकांना मानसिक आधार देण्याच्या दृष्टीने समुपदेशन करण्यासाठी खालील अधिका-यांची याद्वारे नियुक्ती करीत आहे. त्यांनी त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या Containment Zone ला दिवसातून वेळोवेळी भेट देवून तेथील नागरीकांची अडअडचणी बाबतची माहिती घ्यावी त्याबाबत या कार्यालयाचे संदर्भीय आदेश ०६ वर नमुद नियुक्त समन्वय अधिकारी यांचे समन्वयाने ते दुर करण्याची कार्यवाही करावी त्याचप्रमाणे तेथील नागरीकांना सदर आजाराबाबत समुपदेशन करुन त्यांना मानसिक आधार द्यावा यासर्व कामाचे क्षणचित्रे काढून ठेवावे.

तसेच खालील नमुद अधिका-यांनी अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांचे संनियत्रनेत त्यांना सोपविलेले कामे वेळेत जबाबदारीने पार पाडावीत व दररोज वेळोवेळी वरीलप्रमाणे भेटी दिल्याचे अहवाल क्षणछायाचित्रासह त्यांचेकडे सादर करावीत. तसेच श्री.प्रसाद कुलकर्णी, तहसिलदार समान्य, डॉ.संजय

Scanned with CamScanner

बिरादार, तहसिलदार सर्वसाधारण व श्री.विजय महाजन, अ.का. जि.अ.का.नांदेड हे याकामी अपर जिल्हाधिकारी नांदेड यांचे कक्षात सहाय्य करतील.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव व पदनाम | नेमुण दिलेले Containment Zone चे नांव |
|---|---|---|
| १ | श्री.राजेंद्र शिंगणे,<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी ( महिला व बाल कल्याण ) जि.प.नांदेड | पिरबु-हाण |
| २ | श्री.व्हि.आर.पाटील,<br>उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) जिल्हा परिषद नांदेड | अंबानगर सांगवी |
| ३ | श्री.तेजस माळवदकर,<br>सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण नांदेड | अबचलनगर |
| ४ | श्री.प्रंशात दिग्रसकर,<br>शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.नांदेड | रहमतनगर |
| ५ | श्री.रितेश बैरागी,<br>सहाय्यक आयुक्त, मनपा नांदेड | लंगरसाहिब |

आणि असेही आदेशित करीत आहे की, जे कोणी व्यक्ती, समुह सदर आदेशाचे उल्लंघन करील, त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. अपर जिल्हाधिकारी नांदेड
५. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
७. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा यांना अनूपालनास्तव
९. सबंधित तहसिलदार जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना अनुपालनास्तव.
१०. सर्व संबंधीत अधिकारी यांना अनुपालनार्थ देण्यात येते.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner